जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/४९३/२०२०

प्रेसनोट दिनांक - ०७/०२/२०२०

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

देहूरोड वाहतुक विभागाचे हद्दीत तळेगाव एम आय डी सी.त्याच प्रमाणे चाकण एम आय डी सी मोठी असल्याने मुंबईकडून चाकणकडे जाणारी वाहने ही तळेगाव शहरातून जातात.त्याच प्रमाणे नाशिक व अहमदनगर कडून तळेगाव एम आय डी सी. करिता येणारीवाहतूक ही देखील तळेगाव शहरातून जाते.तळेगाव स्टेशन चौकातून अंदाजे २० फूट रुंदीचा रेल्वे पुल असल्याने त्या ठिकाणी एका वेळी दोन वाहने जाउ शकतात.सदरचा भागहा वर्दळीचा आहे.पूलाला लागूनच पोस्ट ऑफिसकडून रेल्वे स्टेशनकडे जाणारा २०० मीटर लांबीचा रस्ता आहे.सदर रस्त्यावरुन रेल्वेस्टेशन कडून पोस्ट ऑफिसकडे येणा-या वाहनांमुळे पोस्ट ऑफिस चौकात वाहतूकीची कोडी होते.त्याप्रमाणे अपघात होतात.सदरचा रस्ता हा एकेरी वाहतूकीस केल्यास ब-याच प्रमाणात वाहतूक नियंत्रित होत आहे. त्याअनुषंगाने तळेगाव-चाकण रोड वरील वाहतूक सुरळीत व सुरक्षित व्हावी याकरीता शहरात येणार सर्व वाहनांना खालील प्रमाणे मनाई करण्यात येत आहे.

## देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत

१.तळेगाव रेल्वे स्टेशन ते जुने पोस्ट ऑफिसकडे सर्व वाहनांना मनाई करण्यात यावी.

पर्यायी मार्ग - सर्व वाहने शिवाजी चौक मार्गे सिंडीकेट बँक चौक येथून इच्छित स्थळी जातील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे देहूरोड वाहतुक विभाग अंतर्गत जाणा-या सर्व वाहनांकरीता वरील मार्गावर वाहतुक एकेरी करणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त,वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि. ०७/०२/२०२० ते दि. २७/०२/२०२० पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात.नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन तात्पुरत्या स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

सुधीर हिरेमठ भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी देहूरोड वाहतुक विभाग
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कंन्टोन्मेंट बोर्ड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner